# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | रविवार, दि. १८ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ७० किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१८४२ : न्या.म.गो.रानडे यांची जयंती.

१८९५ : रविकिरण मंडळातील कवी वि.द.घाटे यांचा जन्म.

१९४४ : भारतीय ज्ञानपीठाची स्थापना.

१९६७ : कृषितज्ज्ञ क्रांतिकारक डॉ.पांडुरंग सदाशिव खानखाजे यांचे निधन.

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८३,५७०.३५ +१८७.६४ (०.२३%) |
| डॉलर | ₹ ९०.७४ |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३१ | १५ |
| दिल्ली | २२ | ०९ |
| मुंबई | २९ | १८ |
| नागपूर | ३० | ११ |
| पुणे | ३१ | ११ |

**सुविचार**

सकाळी उठून स्वतःला सांगा, आजचा दिवस माझा आहे!शुभ सकाळ!

**सुर्योदय - सुर्यास्त**

स.-७:०७ संध्या-६:०९

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)

१,४५,५३५/- २,९५,०००/-

**केळी भाव**

नवती : ७५१ ते ७७०

पिल बाग : २५१ ते २७०

कांदे बाग : ----

# महापौरपदाच्या राजकारणाला नवे वळण

## एकनाथ शिंदेंनी नगरसेवकांना ठेवलं हॉटेलात

वृत्तसंस्था । मुंबई

**सर्वात श्रीमंत महानगरपालिका असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेत तब्बल २५ वर्षांनंतर ठाकरे गटाची सत्ता भाजप आणि एकनाथ शिंदे गटाच्या युतीने उलथवून लावली आहे. या निवडणुकीत भाजपने ८९ जागांवर विजय मिळवला असून, उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला ६५ जागा मिळाल्या आहेत. तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला २९ जागा मिळाल्याने भाजप-शिंदे गटाची सत्ता स्थापन होणे जवळपास निश्चित मानले जात आहे.**

● आमची शिवसेना कागदावर संपवू शकतात, पण जमिनीवरची शिवसेना संपवू शकत नाहीत. उलट त्यांची शिवसेना फक्त कागदावरच उरली आहे, हे या निकालातून स्पष्ट झाले आहे, असा हल्लाबोल उद्धव ठाकरेंनी केला. तसेच साम-दाम-दंड-भेद वापरून आमिषे दाखवली गेली, यंत्रणांचा गैरवापर करून गद्दारी विकत घेतली गेली, पण निष्ठा विकत घेता येत नाही, असंही उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.



मात्र, या स्पष्ट संख्याबळाच्या पार्श्वभूमीवरही उद्धव ठाकरे यांनी केलेल्या एका वक्तव्यामुळे मुंबईत पुन्हा एकदा महापौरपदाच्या राजकारणाला नवे वळण मिळाले आहे. आज मातोश्रीवर नवनिर्वाचित नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटावर जोरदार टीका केली.

यावेळी उद्धव ठाकरे यांनी थेट महापौरपदावर भाष्य करत मोठं विधान केलं. मुंबईत आपलाच महापौर व्हावा हे आमचं स्वप्न आहेच. बघू, देवाच्या मनात असेल तर तेही होईल. आकडा गाठता आला नाही कारण त्यांनी गद्दारी करून विजय मिळवला. हा विजय मुंबई गहाण टाकण्यासाठी मिळवलेला आहे. या पापाला मुंबईकर आणि मराठी माणूस कधीच माफ करणार नाही, असं ठाकरे म्हणाले. ठाकरेंच्या या वक्तव्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची धडधड वाढल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. कारण निकालानंतर शिंदे गटाने निवडून आलेल्या नगरसेवकांना एका फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये ठेवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. सत्तास्थापनेपर्यंत नवनिर्वाचित नगरसेवकांना एकत्र ठेवले जाणार असल्याचे सांगितले जात आहे. यामुळे शिंदेंना ठाकरेंची धास्ती लागली आहे का? असा सवाल उपस्थित होत असून, मुंबई महापालिकेतील सत्तास्थापनेपूर्वी राजकीय हालचाली अधिकच वेगाने घडताना दिसत आहेत.

# निवडणूक आयुक्त संविधानापेक्षा मोठे नाहीत : उद्धव ठाकरे

वृत्तसंस्था । मुंबई

**शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज शिवसेना भवन येथे पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांना पत्रकारांनी निवडणूक आयुक्तांबद्दल प्रश्न विचारला, या प्रश्नाचं उत्तर देत असताना त्यांनी निवडणूक आयुक्तांवर निशाणा साधला. अशा निवडणूक आयुक्तांविरुद्ध जनता ॲक्शन घेईल. त्यांनी लोकांच्या भावनेचा खेळ करु नये. ते म्हणजे ब्रह्मदेवाचे बाप नाहीयत. त्यांनी लोकशाहीचा अपमान करु नये. लोकशाहीचा अपमान केला तर निवडणूक आयुक्तांनाही शिक्षा करावी लागेल. त्यांनी लोकभावनेचा आणि संविधानाचा अनादर करु नये, असं उद्धव ठाकरे म्हणाले.**

संविधानापेक्षा निवडणूक आयुक्त मोठे नाहीत. ते सुद्धा एक मतदार आहेत. त्यांनादेखील मतदानाचा अधिकार असतो. ते जर एका पक्षाला मतदान करु शकत असतील तर याचा अर्थ ते निष्पक्षपणे काम करु शकतात का? हा प्रश्न त्यांना विचारावा लागेल, अशी भूमिका उद्धव ठाकरे यांनी मांडली.

आपल्या मराठीमध्ये एक म्हण खूप छान आहे. अति तिथे माती, त्यांचं आता अति होतंय त्यामुळे त्यांचं आता माती व्हायला वेळ लागणार नाही. २०२९ हे खूप लांब झालं. शिंदेंच्या शिवसेनेचा अडीच वर्षांचा महापौर बनणार का, की त्यांचा पक्ष फोडून भाजप महापौर बसवणार? जसं त्यांनी माझा पक्ष फोडून सरकार बनवलं होतं. ते आता पाहणं इंटरेस्टिंग असेल. मला वाटतं त्यांचा पक्ष फोडून ते भाजपचा महापौर बसवतील, असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला. (पान २ वर)

**थोडक्यात**

### नाशिकमध्ये भाजपचा बहुमताचा टप्पा पार

**नाशिक ।** नाशिक महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपने ७२ जागा जिंकत पुन्हा एकदा एकहाती सत्ता मिळवली आहे. बहुमतासाठी आवश्यक असलेल्या ६२ जागांचा टप्पा भाजपने सहज ओलांडला असून, कोणाच्याही पाठिंब्याशिवाय सत्ता स्थापन करण्याची स्थिती आहे. या निवडणुकीत भाजपला थेट आव्हान देत महापौरपदाचे स्वप्न पाहणाऱ्या शिंदेसेनेला मात्र केवळ २६ जागांवर समाधान मानावे लागले आहे.

### हिमाचलमध्ये हिमवृष्टी: उत्तर भारतात थंडीचा कडाका

**लखनौ ।** काश्मीरपासून हिमाचल प्रदेशापर्यंतच्या डोंगराळ भागात झालेल्या जोरदार हिमवृष्टीमुळे संपूर्ण उत्तर भारत गारठला आहे. दिल्ली, उत्तर प्रदेश, पंजाब आणि हरियाणासह १२ राज्यांमध्ये कडाक्याची थंडी पडली असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. उत्तर प्रदेशात दाट धुक्यामुळे झालेल्या विविध रस्ते अपघातांत ५ जणांचा मृत्यू झाला असून ५० हून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत.

# प्रायव्हेट फोटो व्हायरल करण्याची धमकी देत २० लाखांची मागणी

वृत्तसंस्था । अहिल्यानगर

**सोशल मीडियाच्या आड लपून प्रायव्हेट फोटो व्हायरल करण्याची धमकी, जीवावर उठणारे मेसेज आणि तब्बल २० लाख रुपयांची खंडणी मागणाऱ्या खंडणीखोर टोळीचा श्रीगोंदा पोलिसांनी कणा मोडून काढला आहे. तीन सराईत आरोपींना गजाआड करत पोलिसांनी ५४ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपी सध्या पोलीस कोठडीत आहेत.**



१ जानेवारीपासून फिर्यादी वैभव आसाराम खेंडके (वय २७, रा. श्रीगोंदा) यांना अज्ञात मोबाईल क्रमांकावरून व्हॉट्सॲपवर धमकीचे मेसेज येऊ लागले. तुझे खासगी फोटो व्हायरल करू अशी भीती दाखवत आरोपींनी २० लाखांची खंडणी मागितली. घाबरलेल्या वैभव यांनी सुरुवातीला १ लाख ५० हजार रुपये दिले. मात्र एवढ्यावर न थांबता आरोपींनी आता तुला किंवा तुझ्या घरच्यांना जिवंत सोडणार नाही अशी जिव्हारी लागणारी धमकी दिली.

प्रकरणाचे गांभीर्य ओळखून श्रीगोंदा पोलिसांनी वेळ न दवडता मोहीम उघडली. पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथके तयार करण्यात आली. सायबर सेलच्या मदतीने मोबाईल ट्रेसिंग करत खंडणीखोरांच्या मुसक्या आवळण्यात (पान २ वर)

### वंदे भारत स्लीपर ट्रेनचा शुभारंभ

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मालदा येथून देशातील पहिल्या वंदे भारत स्लीपर ट्रेनला हिरवा कंदील दाखवला. ही ट्रेन पश्चिम बंगालमधील हावडा ते आसाममधील गुवाहाटी येथील कामाख्या जंक्शन दरम्यान धावणार आहे. यावेळी पंतप्रधानांनी ३,२५० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध रेल्वे आणि रस्ते प्रकल्पांचे भूमिपूजन केले, तसेच उत्तर बंगालला देशाच्या इतर भागांशी जोडणाऱ्या चार अमृत भारत एक्सप्रेस गाड्यांनाही हिरवा कंदील दाखवला. या नवीन ट्रेनमुळे हावडा ते गुवाहाटी दरम्यानचा प्रवासाचा वेळ सुमारे अडीच तासांनी कमी होणार असून, यामुळे पर्यटन आणि धार्मिक प्रवासाला मोठी चालना मिळणार आहे.

# अमेरिकेत ७५ देशांच्या नागरिकांना प्रवेश बंदी

वृत्तसंस्था । वाशिंग्टन



**अमेरिकेच्या विदेश मंत्रालयाने ७५ देशांतील नागरिकांसाठी व्हिसा प्रक्रिया थांबवली आहे. यामध्ये रशिया ,ब्राझील यांसारख्या देशांचा समावेश आहे. ट्रंप प्रशासनाच्या मते, या निर्णयामागे अमेरिकेत पब्लिक चार्ज बनण्याची शक्यता असलेल्या अर्जदारांवर लक्ष ठेवणे हा मुख्य उद्देश आहे. या निर्बंधांची अंमलबजावणी २१ जानेवारीपासून अनिश्चित काळासाठी लागू होणार आहे.**

**प्रवेश बंदी का?**

सरकारी मदतीवर अवलंबून राहण्याची शक्यता असलेल्या अर्जदारांना रोखण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. मंत्रालय आता व्हिसा स्क्रीनिंग आणि तपासणी प्रक्रियेचे पुनर्मूल्यांकन करेल. नवीन सुरक्षा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ही बंदी कायम राहील. असे परराष्ट्र मंत्रालयाच्या मेमोनुसार समोर येत आहे. (पान २ वर)

**➤ व्हिसा नाकारण्याचे नवे नियम**

नोव्हेंबर २०२५ मध्ये जारी केलेल्या निर्देशांनुसार, आता काऊन्सलर अधिकारी आरोग्य, वय, इंग्रजी भाषेचे ज्ञान नसणे आणि आर्थिक परिस्थिती या आधारावर व्हिसा नाकारू शकतात. नवीन नियमांनुसार, वृद्ध किंवा जास्त वजन असलेल्या अर्जदारांनाही व्हिसा देण्यास नकार दिला जाऊ शकतो. याव्यतिरिक्त, जर एखाद्या व्यक्तीने भूतकाळात सरकारी रोख मदत घेतली असेल किंवा दीर्घकाळ उपचारांची गरज भासण्याची शक्यता असेल, तर त्यांना अमेरिकेत प्रवेश मिळणार नाही. अमेरिकेच्या सार्वजनिक संसाधनांवर भार बनू शकणाऱ्या परदेशी नागरिकांना रोखणे हे प्रशासनाचे उद्दिष्ट आहे.

# एमआयएमला फोडण्याचे प्रयत्न झाले तर जनताच धडा शिकवेल : खा. ओवैसी

वृत्तसंस्था । हैदराबाद


**हैदराबाद येथे आयोजित पत्रकार परिषदेत एमआयएमचे प्रमुख खा. असदुद्दीन ओवैसी यांनी महाराष्ट्र आणि विशेषतः मुंबई महापालिका निवडणूक निकालांवर महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया दिली. महापालिकेत कोणाला पाठिंबा द्यायचा किंवा आघाडी करायची की नाही, याचा निर्णय हा केवळ पक्षपातळीवरच घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.**

यावेळी बोलताना ओवैसी म्हणाले की, महापालिकेत कोणत्या पक्षासोबत जाण्याचा निर्णय एमआयएम पक्षच घेईल. कोणत्याही नगरसेवकाला स्वतः हून असा निर्णय घेण्याचा अधिकार नाही. पक्षाच्या निर्णयाविरोधात कोणी पाऊल उचलल्यास त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. मुंबई महापालिकेत भाजप किंवा उद्धव ठाकरे गटाला पाठिंबा देण्याच्या चर्चांवर प्रतिक्रिया देताना त्यांनी जर कोणी एमआयएमला तोडण्याचा प्रयत्न केला, तर जनताच धडा शिकवेल असा इशारा दिला.

# इराणमधील भारतीयांच्या सुटकेसाठी ‘ऑपरेशन सुरक्षा’

वृत्तसंस्था । नवीदिल्ली

**इराण आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या लष्करी तणावाच्या पार्श्वभूमीवर, भारत सरकारने तेथे अडकलेल्या आपल्या नागरिकांना मायदेशी परत आणण्यासाठी ऑपरेशन सुरक्षा ही मोठी मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत पहिल्या विशेष विमानाद्वारे २२० भारतीय नागरिक सुरक्षितपणे दिल्लीत पोहोचले आहेत.**




मिळालेल्या माहितीनुसार, भारतीय हवाई दलाचे ङ्सी-१७ ग्लोबमास्टरफहे विमान इराणच्या इमाम खुमैनी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून रवाना झाले असून, ते आज शुक्रवारी उशिरापर्यंत हिंडन एअरबेसवर पोहोचण्याची शक्यता आहे. इराणमध्ये सध्या सुमारे १२ ते १५ हजार भारतीय वास्तव्यास आहेत. त्यापैकी ४ हजार नागरिक अशा भागात अडकले आहेत, जिथे लष्करी हालचाली अधिक आहेत.

सुटकेच्या मोहिमेत ज्येष्ठ नागरिक, महिला आणि बालकांना प्रथम स्थान दिले जात आहे. परराष्ट्र मंत्रालयाने दिल्लीत २४ तास कार्यरत राहणारी कंट्रोल रूम स्थापन केली असून, तेहरानमधील दूतावास स्थानिक प्रशासनाशी सातत्याने समन्वय साधत आहे. समुद्रात अडकलेल्या १६ भारतीय खलाशांच्या सुटकेसाठी भारतीय नौदलाची युद्धनौका सज्ज ठेवण्यात आली आहे.

इराणमधील युद्धसदृश परिस्थितीमुळे एअर इंडिया आणि इंडिगो यांसारख्या कंपन्यांनी इराणच्या हवाई क्षेत्राचा वापर करणे बंद केले आहे. आता भारतीय विमाने लांबचा आणि पर्यायी मार्ग वापरून युरोप व आखाती देशांकडे जात आहेत. जर इराणने आपली हवाई सीमा पूर्णपणे बंद केली, तर भारत चाबहार बंदरा मार्गे सागरी मार्गाने नागरिकांना बाहेर काढण्याची शक्यता आहे. या तणावाचा थेट परिणाम भारताच्या हितावर होऊ शकतो. इराणमधील चाबहार बंदर प्रकल्पात भारताची मोठी गुंतवणूक आहे. तसेच, इराणमधून होणारा कच्च्या तेलाचा पुरवठा विस्कळीत झाल्यास भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. परराष्ट्र तज्ज्ञांच्या मते, अमेरिका आणि इराण या दोन्ही देशांशी भारताचे (पान २ वर)

# कुंभ परिसरात बिगरहिंदू अधिकारी नकोत

## गंगा सभा व संतसभेची जिल्हा प्रशासनाकडे मागणी



वृत्तसंस्था । हरिद्वार

**हरिद्वार येथील कुंभ परिसरात बिगरहिंदू सरकारी अधिकारी, संस्थांचे प्रतिनिधी, तसेच बिगरहिंदू पत्रकारांनादेखील प्रवेशबंदी करावी, अशी मागणी गंगा सभेने जिल्हा प्रशासन तसेच, अन्य सरकारी विभागांकडे केली आहे. कुंभ परिसरात बिगरहिंदूंना प्रवेश देऊ नये, ही मागणी अलीकडेच गंगा सभा व संतसभेने केली होती.**

हरिद्वार येथील प्रसिद्ध व प्रमुख हर की पौडी हा घाट तसेच, अन्य घाटांचे व्यवस्थापन गंगा सभेतर्फे केले जाते. या सभेचे अध्यक्ष नितीन गौतम यांनी ही माहिती दिली. येथील कुंभ परिसरात कोणत्याही बिगरहिंदू व्यक्तीस प्रवेश दिला जाऊ नये, अशी आमची मागणी आहे. अशी बिगरहिंदू व्यक्ती ही सरकारी कर्मचारी-अधिकारी असेल अथवा सरकारी संस्थेची प्रतिनिधी असेल किंवा माध्यम प्रतिनिधी असेल, तरीही हाच नियम लावण्यात यावा. सनातन परंपरा, गंगेचे धार्मिक अस्तित्व आणि हर की पौडी येथील पावित्र्य सर्वांत महत्त्वाचे आहे, असे ते म्हणाले. हरिद्वार नगरपालिकेच्या १९१६मधील उपविधींमध्ये हिंदूंच्या या भावनांचा विचार करण्यात आला असून हर की पौडी व अन्य घाटांच्या ठिकाणी बिगरहिंदूंना प्रवेशबंदी करण्यात आली आहे, असेही त्यांनी सांगितले.

**परिसरात सूचना फलक लावण्याची सूचना**

अरबी शेखांप्रमाणे पोषाख परिधान केलेले दोन तरुण हर की पौडी येथे मंगळवारी फिरताना आढळले होते. (पान २ वर)

# इन्फोसिसच्या दमदार ताळेबंदाचा बाजारावर प्रभाव

वृत्तसंस्था । मुंबई

**● सेन्सेक्स-निफ्टीत तेजी**

**तिसऱ्या तिमाहीत इन्फोसिस कंपनीचा महसूल वाढला आहे. त्याचबरोबर आगामी काळातही महसूल वाढण्याची शक्यता कंपनीने व्यक्त केली आहे. त्यामुळे इन्फोसिस कंपनीसह माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील इतर कंपन्यांच्या शेअरच्या भावात वाढ झाली. परिणामी जागतिक नकारात्मक परिस्थितीतही शेअर बाजाराचे निर्देशांक वाढण्यास मदत झाली.**

मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स १८७ अंकांनी वाढून ८३,५७० अंकावर बंद झाला. सकाळी सेन्सेक्स तब्बल ७५२ अंकांनी वाढला होता. मात्र नंतर नफेखोरी होऊन निर्देशांकाला ही पातळी कायम ठेवता आली नाही. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी २८ अंकांनी म्हणजे ०.११ टक्क्यांनी वाढून २५, ६९४ अंकावर बंद झाला. निर्देशांक सध्या कमी पातळीवर असल्यामुळे बर्याच कंपन्यांच्या शेअरचे भाव कमी पातळीवर आहेत. (पान २ वर)

## संपादकीय

### ताम्रधातूला लकाकी

मागील वर्ष जागतिक अर्थकारणात खळबळ उडवणारे ठरले असले, तरी संपूर्ण वर्षभर आणि वर्ष सरल्यानंतरही चर्चा राहिली ती सोने आणि चांदीमध्ये झालेल्या ऐतिहासिक भाववाढीची. गेल्या एका वर्षात सोन्याने ७० ते ८० टक्के परतावा दिला असताना चांदीने तर १४० टक्क्यांच्या आसपास झेप घेत सर्वांनाच चकित केले आहे. मात्र, आता या शर्यतीत तांबे अर्थात कॉपरनेही आपली ताकद दाखवण्यास सुरुवात केली असून तांब्याचे दर अनेक वर्षांच्या उच्चांकी पातळीवर पोहोचले आहेत. लंडन मेटल एक्सचेंजमध्ये तांब्याचे दर प्रति टन १२ हजार अमेरिकन डॉलर्सच्या आसपास आहेत, तर भारतीय वायदा बाजारात (एमसीएक्स) तांब्याने प्रति किलो १२७७ रुपयांचा पल्ला ओलांडला आहे. देशांतर्गत पायाभूत सुविधा, अक्षय ऊर्जा प्रकल्प आणि ग्राहकोपयोगी वस्तूंच्या वाढत्या विक्रीमुळे तांब्याची मागणी ९ टक्क्यांहून अधिक वाढली आहे. स्टरलाइट प्रकल्प बंद झाल्यापासून भारत रिफाइंड तांब्यासाठी मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय किमतींमधील प्रत्येक चढ–उताराचा थेट परिणाम स्थानिक ग्राहकांवर आणि उद्योगांवर होत आहे. २०२६ या वर्षात तांब्याचे दर प्रति किलो १३०० ते १३५० रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत असली तरी, जागतिक राजकारणातील बदल, डॉलरची स्थिती आणि चीनमधील मागणीचा ओघ या घटकांवर भविष्यातील किमतींचे गणित अवलंबून असेल. केवळ औद्योगिक वापरासाठी मर्यादित न राहता तांबे आता जागतिक अर्थव्यवस्थेच्या परिवर्तनातील एक धोरणात्मक धातू म्हणून उदयाला आले आहे. या दरवाढीमागे वाढती मागणी, घटलेला पुरवठा आणि बदलती जागतिक परिस्थिती ही प्रमुख कारणे आहेत. तांब्याच्या मागणीत होणार्या या प्रचंड वाढीचे मुख्य कारण म्हणजे जगभरात वेगाने सुरू असलेले विद्युतीकरण होय. विशेषतः इलेक्ट्रिक वाहने, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा प्रकल्प आणि आधुनिक पावर ग्रिड्सच्या उभारणीत पारंपरिक यंत्रणेपेक्षा कित्येक पटीने जास्त तांब्याचा वापर होतो. सध्या जगभरात हरित ऊर्जा आणि इलेक्ट्रिक मोबिलिटीवर मोठ्या प्रमाणावर भर दिला जात असल्याने वाहन उत्पादक आणि पायाभूत सुविधा कंपन्या आधीच तांब्याचा साठा करून ठेवत आहेत. यामुळे प्रत्यक्ष बाजारपेठेत तांब्याचा पुरवठा कमालीचा आटला असून त्याचा थेट परिणाम किमतींवर दिसून येत आहे. तांब्याची नवी खाण सुरू करणे ही अत्यंत वेळखाऊ आणि भांडवली खर्चाची प्रक्रिया असल्याने मागणीच्या तुलनेत पुरवठ्याची ही दरी पुढील अनेक वर्षे कायम राहण्याची शक्यता आहे. तांब्याची ही मागणी आता केवळ पारंपरिक उद्योगांपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या (ईव्ही) वाढत्या विस्तारामुळे याला नव्या युगाचे सोने म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. एआय क्षेत्रासाठी आवश्यक असणाऱ्या महाकाय डेटा सेंटर्सच्या उभारणीत आणि ऊर्जा प्रकल्पांमध्ये तांब्याचा वापर अनिवार्य आहे, ज्याचा परिणाम म्हणून २०२५ मध्ये तांब्याच्या किमतीत सुमारे ४० टक्क्यांहून अधिक वाढ नोंदवण्यात आली आहे. चीन हा जगातील तांब्याचा सर्वात मोठा ग्राहक असून तिथल्या उत्पादन क्षेत्रातील हालचालींचा तांब्याच्या दरांवर मोठा प्रभाव पडतो.

## आरोग्यदायी जीवनासाठी सर्वांनी आपल्या जीवनात योगाभ्यास केला पाहिजे : अतुल जैन

प्रतिनिधी । जळगाव

**योग हे भारतीय संस्कृतीने जगाला दिलेली देण आहे. योगामुळे मानसिक, शारीरिक आरोग्य चांगले राहते. मन:शांती मिळते. आरोग्यदायी जीवनासाठी लहानांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्वांनी आपल्या जीवनात योगाभ्यास केला पाहिजे. राष्ट्रीय योगासन स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडूंना मोठे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. योगाच्या विविध प्रकारांचे सादरीकरण करुन आपली प्रतिभा भारतातून आलेले खेळाडू अनुभूती निवासी स्कूलमध्ये दाखवित आहेत, असे प्रतिपादन अनुभूती स्कूलचे अध्यक्ष अतुल जैन यांनी केले.**



अनुभूती निवासी स्कूलमध्ये मुलींच्या १७ वर्षाखालील ६९ वी नॅशनल स्कूल गेम्स राष्ट्रीय योगासन स्पर्धेचे उद्घाटन शनिवार, दि.१७ रोजी झाले. याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.चे अध्यक्ष अशोक जैन, अनुभूती स्कूलच्या संचालिका निशा जैन, प्राचार्य देबाशीस दास, सीआयएससीईचे सहसचिव अर्जित बासू, व्यवस्थापक अर्णव शॉ, विभागीय स्पोर्टस समन्वयक सिद्धार्थ किर्लोस्कर, मुख्य पंच डॉ. आरती पाल, एसजीएफ आयचे मुख्य निरीक्षक रितू पाठक आदी उपस्थित होते.

सुरुवातीला अनुभूती इंग्लिश मीडिअम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत म्हटले. अशोक जैन यांनी सीआयएससीई बोर्डच्या स्पर्धेचा ध्वज फडकवला. त्यानंतर अशोक जैन यांनी स्पर्धेची मशाल राष्ट्रीय योग खेळाडू यशश्री नांद्रे हिच्याकडे सुपर्द केली. यशश्रीने प्रदीप सपकाळेकडे तर प्रदीपने ऋद्राक्ष माळीकडे मशाल दिली. शेवटी अन्मय जैन यांच्याकडे मशाल देण्यात आली. त्याच्यासोबत चौघही खेळाडूंनी स्पर्धेची क्रीडाज्योत प्रज्वलित केली. अर्णव शॉ यांनी स्पर्धकांना शपथ दिली.

**रिंग जगलिंग, रनपा नृत्याने रंगत**

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी अनुभूती इंग्लीश मीडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. रिंग जगलिंगने दमदार सुरवात झाली. रिंगच्या साह्याने सादर केलेल्या सामूहिक कसरतींचे प्रेक्षकांनी कौतुक केले. यानंतर ओडिशातील पारंपारिक काठ्यांवरील रनपा नृत्य सादर केले. तोल सांभाळत काठीवर चालत सादर केलेल्या या थरारक नृत्याने प्रेक्षकांची मने जिंकली. लाठी–काठी या अनोख्या नृत्यप्रकाराला उपस्थितांनी भरभरून दाद दिली.

## उडान दिव्यांग प्रशिक्षण संस्थेत उत्साहात पार पडले योग शिबीर

प्रतिनिधी । जळगाव

**येथील उडान दिव्यांग प्रशिक्षण संस्थेतील दिव्यांग मुलांसाठी एक महिना कालावधीचे योग प्रशिक्षण शिबिर आयोजीत करण्यात आले होते.**



शिबिराचे कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ योगा मधील एम. ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनी स्वाती ढाके यांच्या पुढाकाराने यशस्वीपणे संचालन करण्यात आले. या शिबिरासाठी प्रा. इंजि. राजेश पाटील, प्रा.डॉ. लीना चौधरी, प्रा.गीतांजली भंगाळे, प्रा.लिंता चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले. शिबिरामध्ये दिव्यांग मुलांना त्यांच्या क्षमतेनुसार सोपी योगासने, प्राणायाम व श्वसनाचे व्यायाम शिकविण्यात आले. योगामुळे शारीरिक आरोग्य, मानसिक स्थैर्य, एकाग्रता व आत्मविश्वास वाढतो, याचे महत्त्व मुलांना प्रत्यक्ष कृतीतून समजावून सांगण्यात आले. मुलांनी यात उत्साहाने सहभाग घेतला. उडान दिव्यांग प्रशिक्षण संस्थेच्यावतीने हर्षाली चौधरी यांनी अशा आरोग्यवर्धक उपक्रमांमुळे दिव्यांग मुलांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळत असून, भविष्यातही असे उपक्रम आयोजित करण्याचा मानस व्यक्त केला.

## महात्मा ज्योतिराव फुले गुणवंत शिक्षक पुरस्कारांचे आज वितरण

प्रतिनिधी । जळगाव

**महाराष्ट्र राज्य समता शिक्षक परिषदेतर्फे आयोजित महात्मा ज्योतिराव फुले गुणवंत शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा रविवार, दि.१८ रोजी दुपारी १ वाजता अल्पबचत भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात आभाळ समतेचे, जागर या दोन काव्यसंग्रहांचे तसेच समतांगण हा विशेषांक आणि निबंध सरी व निबंध पर्ण या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समता शिक्षक परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डी.के. अहिरे राहणार असून पालकमंत्री गुलाबराव पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहेत. यावेळी ज्येष्ठ साहित्यीक तथा पत्रकार उत्तम कांबळे यांचे भारतीय संविधान आणि समता, ज्येष्ठ पत्रकार किरण सोनवणे यांचे शिक्षकांसमोरील आव्हाने तर समता शिक्षक परिषदेचे प्रदेशाध्यक्ष भरत शिरसाठ यांचे आभाळ समतेचे–समतामूलक क्रांतीचा शब्द एल्गार या विषयावर व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमाला शिक्षक आ.किशोर दराडे, डायटचे प्राचार्य डॉ.अनिल झोपे, वरिष्ठ अधिव्याख्याता सी.डी. साळुंखे, अधिव्याख्याता डॉ.संगीता महाजन, डॉ.जगन्नाथ दरंदले, सेवानिवृत्त अधिव्याख्याता डॉ.डी.बी. साळुंखे, समता शिक्षक परिषदेचे प्रदेशाध्यक्ष भाऊसाहेब अहिरे यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## उद्योग, व्यवसाय करताना सेवाभाव जपत मूल्यांची जोपासना करावी : राजीव शर्मा

प्रतिनिधी । जळगाव

**उद्योग–व्यवसाय करताना सेवाभाव जपत मूल्यांची जोपासना करावी. त्यात प्रामाणिकपणा, गुणवत्ता आणि सातत्य असणे नैतिकदृष्ट्या अत्यंत मोलाचे आहे, असे प्रतिपादन शर्मा रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० चे माजी प्रांतपाल राजीव शर्मा यांनी केले.**




रोटरी क्लब ऑफ जळगाव सेंट्रलतर्फे गणपती नगरातील रोटरी हॉलमध्ये 'वोकेशनल मंथ'निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष जितेंद्र बरडे, मानद सचिव ॲड. केतन ढाके उपस्थित होते.

पुढे बोलतांना श्री.शर्मा म्हणाले की, काही काम करण्यासाठी वेळ नाही, हे कारण अनेक जण सांगतात. मात्र अत्यंत व्यस्त असलेल्या व्यक्ती देखील वेळेचे व्यवस्थापन करून वेळ देत असतात. रोटरीच्या फेलोशिप, फ्रेंडशिपबरोबर आपले कौशल्य इतरांना शिकवा. आपल्या उद्योग व्यवसायात गरजू, दिव्यांग अशा विशेष व्यक्तींना प्राधान्य द्यावे. जो स्वत:साठी जगतो त्याचे मरण झाले असे म्हटले जाते. परंतु जो इतरांसाठी जगतो त्याचे स्मरण केले जाते असेही शर्मा यांनी यावेळी सांगितले. मान्यवरांचा परिचय डॉ.नरेंद्र जैन यांनी करुन दिला तर आभार राजेश चौधरी यांनी मानले.

## जेसीआय अध्यक्षपदी अंजली गादिया

प्रतिनिधी । जळगाव

जेसीआय जळगाव सेंट्रल संस्थेची नवीन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यात संस्थेच्या अध्यक्षपदी अंजली गादिया यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.नुकत्याच झालेल्या बैठकीत संस्थेच्या २०२६ सालासाठीच्या नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. अध्यक्षपदी अंजली गादिया, उपाध्यक्षपदी अर्पित बेहडे, सचिवपदी गौरव कोगटा, विश्वस्तपदी मोनिका ओस्तवाल, एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टरपदी अक्षय गादिया, अथांग पारेख यांची निवड करण्यात आली. या निवडीमुळे संस्थेत उत्साहाचे वातावरण असून, सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे कौतुक होत आहे.

## पान १ वरुन

**अमेरिकेत ७५ देशांच्या......**

परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते टॉमी पिगॉट यांनी सांगितले की, अमेरिकन जनतेचा फायदा घेऊन कल्याणकारी योजनांवर अवलंबून राहणाऱ्या लोकांना रोखण्यासाठी अमेरिका आपल्या जुन्या अधिकारांचा वापर करेल. ट्रंप सरकारने रशिया, अफगाणिस्तान, ब्राझील , इराण, सोमालिया, इराक, इजिप्त, नायजेरिया, थायलंड, येमेन आणि इतर देशांतील नागरिकांच्या प्रवेशावर बंदी घातली आहे. प्रशासनाचा दावा आहे की, सोमालियावर अमेरिकन अधिकाऱ्यांचे विशेष लक्ष आहे. मिनेसोटा येथे उघडकीस आलेल्या एका मोठ्या फसवणूक घोटाळ्यानंतर ही कारवाई अधिक कडक करण्यात आली आहे. या घोटाळ्यात करदात्यांच्या पैशातून चालणाऱ्या कल्याणकारी कार्यक्रमांचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर झाल्याचे आढळून आले होते. फेडरल तपासात हजारो लोक बनावट कागदपत्रांच्या आधारे सरकारी मदत घेत असल्याचे समोर आले.

**इराणमधील भारतीयांच्या......**

चांगले संबंध असल्याने, या संकटकाळात भारताची मुत्सद्देगिरी जगासाठी महत्त्वाची ठरणार आहे. दरम्यान, डिसेंबरपासून इराणमध्ये महागाई आणि रियाल चलनाचे ऐतिहासिक अवमुल्यन यामुळे संपूर्ण देशातील लोक रस्त्यावर उतरले आहेत. मोठ्या प्रमाणावर निदर्शने करत आहेत. यामध्ये इराण सरकारच्या कारवाईत आतापर्यंत पाच हजारावर नागरिक मृत्यूमुखी पडले आहेत. तर हजारो जणांना अटक केली आहे. यापूर्वीच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराण सरकारला इशारा दिला होता की, जर निदर्शकांच्या मृत्यूत वाढ झाली तर आम्ही कारवाई करू. अमेरिकेने लष्करी कारवाईची तयारी केली असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे आता मध्यपूर्वेत युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यासारखी स्थिती आहे.

**कुंभ परिसरात बिगरहिंदू......**

या घटनेचा संदर्भही त्यांनी दिला. काही जण मुद्दाम विशिष्ट प्रकारे वेशांतर करून या घाटांवर येऊन येथील वातावरण खराब करण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु हे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. हे रोखण्यासाठी या परिसरात बिगरहिंदूंना प्रवेश निषिद्ध आहे या अर्थाचे सूचना फलक प्रशासनाने उभारावेत, अशी मागणी त्यांनी केली. या मागणीविषयी मी जवळपास सर्व उच्चपदस्थ सरकारी अधिकाऱ्यांशी बोललो आहे, असेही ते म्हणाले.

**इन्फोसिसच्या दमदार......**

अशा परिस्थितीत काही गुंतवणूकदारांनी निवडक खरेदी केल्यामुळे निर्देशांकांना आधार मिळाला. इन्फोसिस कंपनीच्या शेअरच्या भावात ५.६७% वाढ झाली. या कंपनीचा तिसर्या तिमाहित महसूल ८.९% वाढून ४५, ४७९ कोटी रुपये इतका झाला आहे. तर आगामी काळात या कंपनीचा महसूल तीन ते साडेतीन टक्क्यांनी वाढण्याची शक्यता कंपनीने ताळेबंदात व्यक्त केली आहे. या कंपनीबरोबरच टेक महिंद्रा, एचसीएल टेक, स्टेट बँक, एचडीएफसी बँक, या कंपन्यांच्या शेअरच्या भावात वाढ झाली. इटर्नल, एशियन पेंट्स, भारत इलेक्ट्रॉनिक्स, सन फार्मा, मारुती या कंपन्यांच्या शेअरच्या भावात घट झाली. भारत अमेरिका व्यापार करार होण्याची शक्यता वाणीज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी व्यक्त केली आहे. त्याचबरोबर पुढील आठवड्यात भारत आणि युरोपियन समुदायादरम्यान मुक्त व्यापार करार होणार असल्याचे बाजारात बोलले जात आहे. इन्फोसिस कंपनीने चांगला ताळेबंद जाहीर केल्यामुळे माहिती तंत्रज्ञान क्षेत्राबाबत आशावाद निर्माण झाला आहे. दरम्यान परदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी बुधवारी ४,७८१ कोटी रुपयांच्या शेअरची विक्री केली तर देशातील संस्थागत गुंतवणूकदारानी ५,२१७ कोटी रुपयांचे शेअरची खरेदी केली.

**प्रायव्हेट फोटो व्हायरल......**

आल्या. चौकशीत आकाश पोपट मोरे, बापू विठ्ठल शिंदे आणि किरण विठ्ठल शिंदे हे तिघे मुख्य आरोपी निष्पन्न झाले. ३ मोबाईल फोन आणि ३ चारचाकी वाहने एकूण किंमत ५४.८० लाख रुपये मुद्देमाल जप्त पोलिसांनी आरोपींकडून गुन्ह्यासाठी वापरलेले ३ मोबाईल फोन आणि ३ आलिशान चारचाकी वाहने जप्त केली असून, एकूण मुद्देमालाची किंमत ५४.८० लाख रुपये इतकी आहे. तपासात आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता असून टोळीचा पसारा मोठा असल्याचे संकेत पोलिसांनी दिले आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीणचंद्र लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. श्रीगोंदा पोलीस आणि सायबर सेलच्या पथकाने दाखवलेली तत्परता सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे.

**निवडणूक आयुक्त......**

काही ठिकाणाहून तक्रारी आल्या आहेत. अनेक ठिकाणी मतदारांच्या मतदार यादीत नाव नसल्याची तक्रार आली होती. विशेषत: मंत्री गणेश नाईक यांचं मतदार यादीत नाव नव्हतं. एका मंत्रिमंडळातील मंत्र्याचं यादीत नाव नसणं हे फार गंभीर आहे, असं ठाकरे यावेळी म्हणाले. ज्या पद्धथीने साधनसामुग्रीचा वापर पलिकडून झाला, कारण तेवढी साधनसामग्री आम्ही आणू शकत नाहीत. ज्या पद्धतीने पैसे ओरबाडत आहेत, महापालिकेची तिजोरी रिकामी करणं आणि इतर काही गोष्टी करणं, त्या वृत्तीचे आम्ही नाहीत, अशी टीका त्यांनी केली.

## मन आणि मनगट मजबूत करणारे संस्कारी शिक्षण काळाची गरज : किरण अग्रवाल

प्रतिनिधी । जळगाव

**आजच्या काळात केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही, तर विद्यार्थ्यांचे मन आणि मनगट दोन्ही मजबूत करणारे संस्कारी शिक्षण मिळणे आवश्यक आहे. वर्गात बसणारा विद्यार्थी अभ्यासानंतर कट्ट्यावर वेळ वाया न घालवता, उत्साहाने खेळाच्या मैदानाचा रस्ता धरत आहे, हे अत्यंत आशादायी चित्र आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार किरण अग्रवाल यांनी केले.**




के.सी.ई.सोसायटी क्रीडा महोत्सव २०२६ आयोजित वार्षिक क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केसीई सोसायटीचे संचालक संजय प्रभुदेसाई हे होते तर प्रमुख पाहुणे केसीई सोसायटीचे खजिनदार डी.टी. पाटील, प्राचार्य डॉ. स.ना. भारंबे, प्रा.बी.व्ही.पवार, प्रा.विश्वनाथ झोपे, प्रा.संजय सुगंधी, प्रिन्सिपल डेव्हिड दास, सुषमा कंची, अर्चना नेमाडे, धनश्री फालक, प्रणिता झांबरे, श्रीधर सुनकरी, अमोल देशमुख, प्रशाकीय अधिकारी शशिकांत वडोदकर उपस्थित होते.

पुढे बोलतांना श्री. अग्रवाल यांनी, बदलत्या जीवनशैलीवर भाष्य करतांना, आजची तरुण पिढी मोबाईल किंवा कट्ट्यांवरील गप्पांमध्ये हरवत चालली आहे की काय, अशी भीती व्यक्त केली जाते. मात्र, जेव्हा एखादी शिक्षण संस्था खेळाच्या माध्यमातून संस्कार रुजवते, तेव्हा विद्यार्थी आपोआपच मैदानाकडे आकर्षित होतो. मैदानात गाळलेला घाम केवळ शरीर मजबूत करत नाही, तर संकटांशी लढण्याची मानसिक शक्तीही देतो, असेही ते यावेळी म्हणाले.

## गिर्यारोहणात आवश्यक सुरक्षा साधने, नियमांचे पालन करावे : डॉ.नारखेडे

प्रतिनिधी । जळगाव

**ट्रेकिंग, क्लाइंबिंग व रॅपलिंग यांचा साहसी क्रीडा प्रकारांत समावेश करण्यात आला असून या क्रीडा प्रकारात प्रशिक्षित मार्गदर्शकाच्या देखरेखी खाली आवश्यक सुरक्षा साधने व नियमांचे पालन करावे, असे आवाहन डॉ.विलास नारखेडे यांनी केले.**




स्वामी विवेकानंद व जिजामाता जयंतीनिमित्त अर्पण सेवा ट्रस्टतर्फे बहिणाबाई विद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.

पुढे बोलतांना डॉ. नारखेडे यांनी, युवकांमध्ये धाडसी नेतृत्व निर्माण होऊन संघ भावना तसेच निसर्ग प्रेम जागृत करण्याच्या उद्देशाने उपक्रम राबवावा. गिर्यारोहणाद्वारे युवकांची शारीरिक व तंदुरुस्ती मानसिकता, खंबीरपणा, आत्मविश्वास तसेच संघ कार्याची भावना वृद्धिंगत होईल, असे सांगून त्यांनी स्वामी विवेकानंदांनी सांगितलेल्या उठा जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका या संदेशाचे पालन करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

## कथाकथनाचे सादरीकरण ही एक सापेक्ष शैली

**• विद्यापीठात आयोजित व्याख्यानात प्रा.डॉ.म.सु.पगारे यांचे प्रतिपादन**

प्रतिनिधी । जळगाव

**कथाकथनाचे सादरीकरण ही एक सापेक्ष शैली आहे आणि आवाजाचा आरोह–आवरोहानुसार प्रत्येक व्यक्तीगणिक ती शैली अतिशय प्रभावी होत असते. त्यामुळे कथाकथन करत असताना वक्त्याला स्वत:ला त्यात विरघळता आले पाहिजे. त्यालाच तादात्म्य पावणे असे म्हणतात, असे प्रतिपादन भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक प्रा.डॉ. म.सु. पगारे यांनी केले.**



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातील मराठी विभागातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त १४ ते २८ जानेवारीदरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या पंधरवड्याचे दुसरे पुष्प गुंफतांना ते बोलत होते. यावेळी नंदुरबार येथील जी.टी. पी. महाविद्यालयाचे प्रा.डॉ. माधव कदम उपस्थित होते.

पुढे बोलतांना प्रा.डॉ. पगारे यांनी, तादात्म्य त्याच्या ज्ञानसाधनेमुळे सिद्ध होते वक्त्याने त्या कथाकथनातून केलेली रुजवात ही श्रोत्यांना आयुष्यभर सूत्ररूपात जगता येते. असे प्रभावित करणारे कथाकथन ऐकल्यावर श्रोते झपाटून जातात. त्यामुळे कथेतून झालेले मूलगामी स्वरूपाचे प्रक्षेपण हे शुद्धतेच्या पातळीवर पोहोचते. या शिवाय साने गुरुजींविषयी बोलतांना प्रा.डॉ. पगारे यांनी, जसे जिजाऊ माँसाहेबांनी छत्रपती शिवाजी महाराजांना घडवले आणि जगासमोर एक महापुरुष उभा राहिला तसेच श्यामला घडविणारी आई ही संस्काररुपी मातृत्वाचे धैर्यपूर्ण सूत्र म्हणून प्रकट होते, असेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी प्रा.डॉ. माधव कदम यांनी, साने गुरुजी लिखित श्यामची आई या पुस्तकातील गोष्टींचे कथाकथन सादर केले. यात भित्रेपणामुळे श्यामच्या पोहण्याला न जाण्याची गोष्ट सादर करत असताना श्यामचा भित्रेपणा त्याच्या आईने घालवण्यासाठी प्रसंगी त्याला मारले होते.

यासोबतच एका गोष्टीत श्याम आंघोळीच्या वेळी आईला त्याचे अंग पदराने पुसायचे म्हणतो आणि यावर तो न थांबता पुढे पायाला घाण लागू नये म्हणून आईला पदर पसरायला सांगतो. त्यावेळी श्यामची आई म्हणते, श्याम बाळा पायाला घाण लागू नये म्हणून जपतोस, तशीच मनालाही घाण लागू नये म्हणून जप हो या वाक्यातून श्यामच्या आईचा संस्कारमयपट श्यामची आई या पुस्तकातील कथांमधून उलगडून दाखवला.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# न्यू धुळे रेल्वे स्टेशनचे काम वेगात; मनमाड-इंदूर रेल्वे प्रकल्पाला गती

प्रतिनिधी । धुळे

**मनमाड – इंदूर रेल्वे मार्ग पूर्ण झाल्यास उत्तर महाराष्ट्र, खान्देश आणि मध्य प्रदेशातील आदिवासी व ग्रामीण भागाला दळणवळण, औद्योगिक विकास आणि रोजगाराच्या दृष्टीने मोठा लाभ होणार आहे. धुळे शहराच्या अवघ्या दहा किलोमीटर अंतरावर बाळापूर (ता. धुळे) शिवारात उभारण्यात येणारे न्यू धुळे रेल्वे स्टेशन मनमाड–इंदूर रेल्वे मार्गाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचे प्रमुख केंद्र ठरत आहे. या स्टेशनपर्यंतचा बोरविहीर–नरडाणा रेल्वे मार्ग युद्धपातळीवर पूर्ण करण्यासाठी यंत्रणा अहोरात्र कार्यरत असून मातीचा भराव, सपाटीकरण, रुंदीकरण, मजबुतीकरण तसेच विद्युतीकरणाची कामे वेगाने सुरू आहेत. त्यामुळे बहुचर्चित मनमाड–इंदूर रेल्वे प्रकल्प अखेर निर्णायक टप्प्यावर पोहोचल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.**



उत्तर महाराष्ट्र, खान्देश आणि मध्य प्रदेशाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा हा रेल्वे मार्ग मंजूर होऊन मोठा कालावधी लोटला असला, तरी आताच महाराष्ट्राच्या हद्दीत प्रकल्पासाठी आवश्यक जमीन पूर्णतः उपलब्ध झाली असल्याचा दावा केला जात आहे. मात्र काही भागांतील शेतकरी रेल्वे मार्गासाठी जमीन दिल्यानंतरही अपेक्षित मोबदला मिळालेला नसल्याची तक्रार करीत आहेत. दरम्यान, या मार्गाचाच भाग असलेल्या बोरविहीर (ता. धुळे) ते नरडाणा (ता. शिंदखेडा) या पट्ट्यातील जमीन अधिग्रहण पूर्ण झाल्याने या ठिकाणी निर्धारित वेळेत कामे पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारकडून पाठपुरावा सुरू आहे. यामुळे धुळे तालुक्यातील बाळापूर ते बोरविहीर दरम्यान प्रचंड वेगाने कामे सुरू झाली आहेत. रेल्वे मार्गावर अंथरण्यात येणाऱ्या सिमेंटच्या पट्ट्या तसेच अन्य साहित्य मोठ्या प्रमाणात दाखल झाले असून, त्यामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

**एकाचवेळी अनेक कामांना वेग**

येथील कामाचा वेग कायम ठेवत पुढील टप्प्यातील जमीन अधिग्रहण, शेतकऱ्यांची देणी आणि अन्य प्रशासकीय प्रक्रिया एकाच वेळी पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. महाराष्ट्र शासन आणि केंद्र शासनाच्या स्तरावर या प्रकल्पाशी संबंधित कोणतेही काम रखडू नये, यासाठी जाणीवपूर्वक काळजी घेतली जात आहे. नरडाणा (ता. शिंदखेडा) ते शिरपूर तालुक्यातील प्रस्तावित रेल्वे मार्गासाठी थेट मध्य प्रदेश सीमेवरील पळासनेरपर्यंत जमीन अधिग्रहणाची अधिसूचना काढण्यात आली असून, महाराष्ट्रातील अधिग्रहणाचा अंतिम टप्पा लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

शिंदखेडा आणि शिरपूर तालुक्यातील जमीन अधिग्रहणाची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात आली असून अनेक शेतकऱ्यांना अधिग्रहणाचे अवॉर्ड मंजूर झाल्याचा दावा रेल्वे मार्ग संघर्ष समितीचे प्रमुख मनोज मराठे यांनी केला. प्रारंभी काही ठिकाणी शेतकऱ्यांचा विरोध होता; मात्र शासनाने योग्य मोबदला देत अनेक ठिकाणी तोडगा काढल्यामुळे बहुतेक अडथळे दूर झाल्याचे त्यांनी सांगितले. शिंदखेडा तालुक्यातील सात ते दहा गावे आणि शिरपूर तालुक्यातील थेट पळासनेरपर्यंतच्या सुमारे बारा गावांमधील जमीन अधिग्रहण प्रक्रिया पूर्ण झाली असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## धुळ्यात लाचखोर मुख्याध्यापिका एसीबीच्या ताब्यात; गुन्हा दाखल

प्रतिनिधी । धुळे

स्व. सुदाम पिंगळे मेमोरिअल ट्रस्ट, धुळे संचलित शहरातील साक्री रोडवरील श्रीमती शांताबाई पिंगळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका भारती गिरीष जोशी (वय ५६) यांनी सेवासंबंधित बिले अदा करण्यासाठी २ हजार ३४० रुपयांची लाच स्वीकारली. त्यांना धुळे एसीबीच्या पथकाने रंगेहात पकडले.

हे तक्रारदार याच विद्यालयात पूर्णवेळ ग्रंथपाल पदावर कार्यरत असून, सेवेस २४ वर्षे पूर्ण झाल्यानंतरच्या कालबद्ध पदोन्नतीच्या बिलाच्या फरकाचे बिल तसेच त्यांचे पुर्णवेळ ग्रंथपाल पदावर उन्नयन रूपांतर झाल्याच्या पगाराचा फरक अदा करण्यासाठी त्यांनी मुख्याध्यापिकेशी संपर्क साधला होता. यावेळी बिले मंजूर करून नियमित पगाराचे बिल आकारण्यासाठी सुरुवातीला २ हजार ५०० रुपयांची लाच मागितल्याची तक्रार दि. १३ जानेवारी रोजी धुळे लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे दाखल केली. तक्रारीची पडताळणी झाल्यानंतर आज दि. १६ रोजी २ हजार ३४० रुपयांची लाच स्वीकारताना मुख्याध्यापिकेला रंगेहात पकडण्यात आले. याप्रकरणी धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस उपअधीक्षक सचिन साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपास पोलीस निरीक्षक पद्मावती कलाल (ला. प्र.वि., धुळे) करीत आहेत.

## थोडक्यात

### सुभाष जगताप यांची विजयाची हॅट्रिक

**धुळे ।** देवपूरातील प्रभाग १ ड चे भाजपाचे उमेदवार सुभाष सुकलाल जगताप यांनी यंदा विजयाची हॅट्रीक केली. सलग तिसऱ्यांदा ते नगसेवक म्हणून निवडून आले आहेत. ही आपण केलेल्या विकास कामांची पावती असून आ. अनुप अग्रवाल, सर्व ज्येष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे यश असल्याचे सांगितले. सुभाष जगताप यांना ६ हजार २७२ मते मिळाली असून त्यांनी राष्ट्रवादीचे उमेदवार योगेश पाटील यांचा तब्बल २ हजार ५५४ मतांनी दारूण पराभव केला आहे. दरम्यान मोठ्या मताधिक्याने निवडून दिल्याबद्दल सुभाष जगताप यांनी प्रभाग १ मधील सर्व मतदारांचे आभार मानले आहेत.

### स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश

**नंदुरबार ।** येथील स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी इंटरमिजिएट व इलेमेंटरी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक निंबा माळी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.या विद्यार्थ्यांच्या यशामागे कला शिक्षक सिद्धांत माळी यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण मेहनत, शिस्त आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे हे यश मिळवले असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडली असून पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेतर्फे तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## शहादा तालुक्यात मेंढ्या चोरी करणारी टोळी जेरबंद

प्रतिनिधी । शहादा

तालुक्यात मेंढ्या चोरी करणाऱ्या टोळीला जेरबंद करण्यात नंदुरबार स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या पोलिसांना यश मिळाले असून आठ आरोपींना गजाआड केले आहे. त्यांच्याकडून रोख रकमेसह दोन चार चाकी वाहने व एक मोटरसायकल असा दहा लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना १९ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

शहादा तालुक्यातील तऱ्हावद शिवारात रस्त्यालगत सोनू ढवळू बोरकर व मोतीराम नागो मारणर या मेंढपाळांनी मेंढ्यांचा पडावं टाकला होता. दि.२ जानेवारी रोजी मध्यरात्री सोनू बोरकर यांच्या १०० व मोतीराम मारणर २० अशा सहा लाख रुपये किमतीच्या १२० मेंढ्या चोरीस गेल्या. ही घटना सकाळी उघडकीस आल्यानंतर शहादा पोलिसात सोनू बोरकर यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल झाला होता. दरम्यान, नंदुरबार स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेलामिळालेल्या गोपनीय माहितीनुसार चोरीस गेलेल्या मेंढ्या चोरट्यांनी राजस्थानकडे नेल्याची माहिती मिळाली. त्यानुसार गुन्हा शाखेच्या पथकाने केलेल्या कारवाईत राजस्थान व मध्यप्रदेश येथून प्रत्येकी चार आरोपींना अटक केली आहे. त्यात एका अल्पवयीन आरोपीचा समावेश आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये चिंटू कालू वंजारा, लक्ष्मण मदन वंजारा, रावल कालू वंजारा, धर्मलाल बाबुलाल बंजारा, सोहम जिया वंजारा, अरबाज नूरमोहम्मद शेख, मोहसीन उर्फ राजा हरून शेख यांचा समावेश आहे. त्यांच्याकडून रोख रकमेसह एक एमपी ०९ एमएम ३२१६ क्रमांकाची मोटर सायकल व एमपी ४५ झेपी–०४७८ अशोक लेलँड, आरजे–२० युबी ५६२७ इको कार अशा तीन वाहनांसह सुमारे दहा लाखांचामुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सपोनि गणेश सूर्यवंशी करीत आहेत. दरम्यान, स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेने शहादा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या या गंभीर घटनेचा छडा लावण्यात यश मिळवले आहे.

## घरपट्टी, पाणीपट्टी थकबाकीदारांना ५० टक्के सवलतीसाठी मुदतवाढ; आ. राजेश पाडवी यांचा पाठपुरावा

प्रतिनिधी । बोरद

**घरपट्टी पाणीपट्टी थकबाकी असलेल्याना ५० टक्के सवलत वाढवून मिळावी यासाठी आ. राजेश पाडवी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली होती. त्याची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदत वाढवून दिली आहे.**

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने सन २०२५–२६ या वर्षासाठी राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाची मुदत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे घरपट्टी पाणीपट्टी मध्ये मिळणारी ५० टके सवलत पुढेही लागु राहणार असून ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. ग्रामपंचायतीना स्थानीक स्वराज्य संस्था म्हणून अधिक सक्षम करण्याचा उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत आहे. आ.राजेश पाडवी यानी जनहितासाठी मुख्यमंत्री यांच्याकडे सतत पाठपुरावा सुरू ठेवला. घरपट्टी पाणीपट्टी मध्ये ५० टक्के सवलत मिलत असल्यामुळे बोरद गावातील शेतकरी वर्गाच्या ग्रामपंचायतीकडे सकारात्मक कल वाढला आहे. सवलतीची मुदत वाढल्याने अनेक शेतकरी आता लाभ घेउन घरपट्टी पाणीपट्टी भरतील हा घेतलेला निर्णय ग्रामस्थाचा हिताचा आहे, असे माजी जि.प. सदस्य संगीता वरसाळे व सामाजिक कार्यकर्ते रविंद्र वरसाळे यांनी सांगितले.

## श्री गुरु तेग बहादूरसिंग साहेब माहिती रथयात्रेचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन

प्रतिनिधी । नंदुरबार

**शिख सांप्रदायातील हिंद की चादर श्री गुरुतेग बहादूर साहेबजी यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दी समागम उपक्रमाचे धर्म जागरण समिती व महाराष्ट्र सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन केले आहे.**



गुरु परंपरा आणि श्री गुरु तेग बहादूरसिंग साहेब यांचा इतिहास जन माणसांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यभर हिंद की चादर या नावाने माहिती रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या रथयात्रेचे नंदुरबारात जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या हस्ते उद्धाटन करण्यात आले.

यावेळी प.पू. प्रकाश चैतन्य महाराज, बाबा ग्यानी रणजीतसिंग महाराज, आनंद चैतन्य महाराज, प. पू. प्रकाश गिरी महाराज, प. पू. वसंत चैतन्य महाराज, नांदेड क्षेत्रिय नियोजन समितीचे सहअध्यक्ष तथा अखिल भारतीय बंजारा क्रांती दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रावण चव्हाण, प्रांताधिकारी अंजली शर्मा आदींची प्रमुख उपस्थिती होती. नंदुरबार जिल्ह्यात हिंद की चादर या माहिती रथाचे आगमन झाले असता दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात बंजारा, शिख, लभाना समाजाच्या महिला, पुरुषांनी हरे राम हरे कृष्णाचे जप करीत बंजारा बोलीभाषेत भजन किर्तन करीत कार्यक्रमाची शोभा वाढविली.

याप्रसंगी शिख समाजाचे धर्मगुरु गुरुनानक महाराज व बंजारा समाजाचे धर्मगुरु संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमा स्वरुप बोधचिन्हाचे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी शिख समाजाचे समशेरसिंग जिगरासिंग, ललकासिंग, सहसंयोजक युवराज चव्हाण, गंगापूर उपसरपंच कृष्णा सेठ, पत्रकार वसंत चव्हाण, नारायणपूरचे ठेकेदार प्रेम चव्हाणआदी उपस्थित होते.

## शिरपूर बालाजी मंदिर परिसरात अन्नदान

प्रतिनिधी । शिरपूर

**खालचे गांव बालाजी मंदिर येथील बालाजी मित्र मंडळाच्या वतीने अन्नदानाचा कार्यक्रम झाला.**

दरवर्षी मकर संक्रातच्या दुसऱ्या दिवशी बालाजी मंदीर परिसरात अन्नदान कार्यक्रम होत असतो. दि. १५ रोजी धुळे भाजपा माजी जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी व उपनगराध्यक्षा संगीता राजेंद्र देवरे यांच्या हस्ते अन्नदान करण्यात आले. यावेळी भाजपा माजी जिल्हा सरचिटणीस अरुण धोबी, वाघाडी सरपंच किशोर माळी, संजय आसापुरे, रविंद्र भोई, महेंद्र पाटील, दिपक बारी, प्रमोद बारी, डॉ. अतुल बडगुजर, श्रीकृष्ण शर्मा, जगदिश बारी, दिलीप वसुले, बाराबलुतेदार महासंघ तालुकाध्यक्ष योगीराज शिंपी, प्रमिला बारी, योगिता बारी, सुवर्णा आसापुरे, मनिषा आसापुरे, सविता बारी, चांदणी बारी, पुजा बारी, कल्पना बारी आदि उपस्थित होते.

## भुश्याच्या गोण्यांखाली लपवलेली बीयर जप्त

प्रतिनिधी । धुळे

**मध्य प्रदेशातून महाराष्ट्रात होणाऱ्या अवैध मद्य तस्करीचे नवनवीन मफंडेफ राज्य उत्पादन शुल्क विभागाने उधळून लावले आहेत. भुश्याच्या गोण्यांखाली अत्यंत चालाकीने लपवून नेली जाणारी मध्य प्रदेश बनावटीची बियर पकडण्यात उत्पादन शुल्क विभागाच्या हाडाखेड पथकाला यश आले आहे.**

८ लाख ५३ हजार रुपयांच्या मुद्देमालासह एका आरोपीला बेड्या ठोकल्या असून, या रॅकेटचा मुख्य सूत्रधार मात्र फरार होण्यात यशस्वी झाला आहे.

हाडाखेड सीमा तपासणी नाक्याचे निरीक्षक ए. पी. मते यांना गुप्त माहिती मिळाल्यानुसार हेद्ऱ्यापाडा शिवार परिसरात सापळा रचला.

संशयास्पद रित्या बोलेरो पिकअपमधून (क्रमांक एमएच ४६ बीयू ७१५८) मालवण–पळासनेर तपासणी दरम्यान वाहनामध्ये जनावरांच्या खाद्याच्या (भुसा) गोण्या रचलेल्या दिसल्या.

मात्र, पथकाने बारकाईने पाहणी केली असता, या गोण्यांच्या खाली मबियरफ्वे बॉक्स लपवल्याचे उघड झाले. तस्करांनी पोलिसांची नजर चुकवण्यासाठी केलेली ही शक्कल खाकीच्या सतर्कतेपुढे फोल ठरली.

## नवापूर एस.टी. आगारात मासिक इंधन बचत अभियान

प्रतिनिधी । नवापूर

**नवापूर एस.टी. आगार विभागात दि.१६ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०१६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या मासिक इंधन बचत कार्यक्रमाचा शुभारंभआज करण्यात आला.**



सेवानिवृत्त शिक्षक भटू जाधव, आय. टी.आय.चे शिक्षक रोहित सुर्वे, शिक्षक योगेश पाडवी, आगार विभागाचे पालक अधिकारी चंद्रकांत पोतदार व आगार प्रमुख विजय पाटील यांच्या हस्ते सरस्वती माता पूजन व दीपप्रज्वलन करून तसेच इंधन बचत मासिक फलकाचे उद्धाटन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांचा सत्कार आगार प्रमुख विजय पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्र मास नवापूर एस.टी. आगारातील विविध विभागांचे अधिकारी, व वाहक कर्मचारी, चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षक याप्रसंगी बोलताना सेवानिवृत्त भटू जाधव म्हणाले की, इंधन बचत ही आजच्या काळाची गरज आहे. प्रत्येक चालकाने इंधन बचतीकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. एक–एक थेंब इंधन वाचल्यास आर्थिक लाभ होतो. प्रवासी वर्गाचा एस.टी. महामंडळावर असलेला विश्वास जपणे हे आपले कर्तव्य आहे. यानंतर आय.टी.आय. चे शिक्षक रोहित सुर्वे यांनी चालकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, बस योग्य गिअरमध्ये चालवणे, बस सुरू केल्यानंतर दोन ते तीन मिनिटे इंजिन चालू ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे इंजिन ऑईलचे सर्क्युलेशन पूर्ण होऊन इंजिनची कार्यक्षमता वाढते व केपीटीएलमध्ये सुधारणा होते. आगार प्रमुख विजय पाटील यांनी सांगितले की, एस.टी. महामंडळाचा सर्वात मोठा खर्च इंधनावर होतो. इंधन नैसर्गिक साधन असून ते मर्यादित आहे, त्यामुळे त्याचे संवर्धन अत्यंत आवश्यक आहे. इंधन बचतीमध्ये चालकांचा वाटा सर्वाधिक महत्त्वाचा आहे.`.

# खडकी येथील रस्त्याचे १० दिवसांतच दुरावस्था

### रस्ता पुन्हा ठेकेदाराकडून स्वखर्चाने तयार करण्याची संतप्त ग्रामस्थांची मागणी

प्रतिनिधी । खांडबारा

खडकीपाडा येथील ग्रामस्थांचा आरोप नवापूर तालुक्यातील खडकी येथील चार किलोमीटरच्या डांबरीकरण रस्त्याचे अवघ्या दहा दिवसातच तीन तेरा वाजले आहेत. अवघ्या १० दिवसांपूर्वी पूर्ण झालेल्या ४ किलोमीटर डांबरी रस्त्याची पूर्णपणे दैना झाली असून रस्त्यावरील डांबर हाताने आणि पायाने उखडून खडी बाहेर येतांना दिसत आहे. अवघ्या १० दिवसांतच रस्त्याचे तीनतेरा वाजल्याने कामाच्या दर्जाबाबत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

निकृष्ट दर्जाचे काम उघड आल्याने अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर या ४ किलोमीटर रस्त्याचे नूतनीकरण करण्यात आले होते. स्थानिक नागरिकांना वाटले होते की आता खराब रस्त्यापासून सुटका होईल.



मात्र, कंत्राटदाराने केलेले काम इतके निकृष्ट दर्जाचे आहे की, पहिल्या १० दिवसांतच रस्त्याचा वरचा थर निघायला सुरुवात झाली आहे. अनेक ठिकाणी हाताने पायाने रस्ता उकडून येत असून रस्ता जणू काही वर्षांपूर्वीचा जुनाच आहे की काय, असा प्रश्न पडत आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, या रस्त्यावरील डांबर चक्क हाताने निघून जात आहे. डांबराचे प्रमाण कमी वापरल्यामुळे आणि रस्ता नीट न दाबल्यामुळे ही परिस्थिती असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. शासनाचा लाखो रुपयांचा निधी अशा प्रकारे पाण्यात जात असेल, तर संबंधित अधिकाऱ्यांनी नेमकी काय पाहणी केली? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

या निकृष्ट कामामुळे वाहनचालकांना पुन्हा एकदा कसरतीचा प्रवास करावा लागत आहे. दुचाकी घसरून अपघात होण्याचे प्रमाणही वाढले आहे. या कामाची वरिष्ठ स्तरावरून चौकशी व्ह–ावी, संबंधित कंत्राटदाराला काळया यादीत टाकावे आणि रस्त्याचे काम पुन्हा स्वखर्चाने करून घ्यावे, अशी मागणी आता जोर धरत आहे.

यावर तातडीने कारवाई झाली नाही, तर स्थानिक नागरिकांनी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. आता प्रशासन याकडे लक्ष देणार की भ्रष्टाचार करणाऱ्यांना पाठीशी घालणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## नगराध्यक्ष करंडकचे २६ रोजी आयोजन

प्रतिनिधी । नंदुरबार

येथील कल्चरल फाऊंडेशनच्या वतीने च्या दरवर्षी प्रमाणे २६ जानेवारी २०२६ प्रजासत्ताक दिनी देश भक्तीपर सोलो आणि समूह नृत्याच्या नगराध्यक्ष करंडकराचे आयोजन करण्यात आले आहे.

डी.आर. हायस्कूलमध्ये होणारी ही स्पर्धा शालेय स्पर्धा असून लहान व कॉलेजियन गटात सोलो व समूह नृत्य मध्ये होतील. २५ हजार रुपयाची रोख बक्षिसे व ट्रॉफी विजेत्यांना दिले जाणार आहे. ज्यांना सहभाग घ्यायचा असेल त्यांनी आपला सराव व्हिडीओ जितेंद्र खवळे ९१५६८७५७७० व चंपालाल चौधरी ९४०३४३४३११यांच्याकडे २४ जानेवारीपर्यंत पाठवावे, असे आवाहन कल्चरल फाउंडेशनचे अध्यक्ष राजेश रघुवंशी, उपाध्यक्ष डॉ. विजय पटेल, सचिव प्रा. सुभाष मोरावकर, दुर्गेश वैष्णव, श्रीराम मोडक, पंकज पाठक, डॉ. सपना अग्रवाल, डॉ. राहुल मेघे, डॉ. दिनेश देवरे, डॉ पंकज पाटील, राजेश अग्रवाल, बाळासाहेब मोरे, प्रवीण पाटील, प्रवीण शर्मा, काशिनाथ सूर्यवंशी, शशी हनुवते, के. एम. बागुल, डॉ. मुकेश रघुवंशी, धर्मेंद्र भारती, डॉ. नरेंद्र गोसावी यांनी केले आहे.

# जळगाव जिल्हा

epaper.shauryamarathi.com जळगाव । रविवार, दि. १८ जानेवारी २०२६ 

# आरोग्य सेवा हे ईश्वरीय कार्य : पालकमंत्री गुलाबराव पाटील

## ● जांभोरा येथे जीपीएस परिवार, मुक्ती फाउंडेशनतर्फे आयोजित शिबिरात १५७ जणांची आरोग्य तपासणी

प्रतिनिधी । धरणगाव

**ग्रामविकासासाठी सदैव कटीबध्द असून आरोग्य सेवा हे ईश्वरीय कार्य आहे, असे प्रतिपादन राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.**

जळगाव ग्रामीण मतदार संघातील जांभोरा या गावी जीपीएस परिवार व मुक्ती फाउंडेशनतर्फे आर.एल.मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या सहकार्याने मोफत आरोग्य तपासणी, औषधोपचार व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते.

याप्रंसगी धरणगाव पंचायत समितीचे माजी सभापती मुकुंद नन्नवरे, माजी जि.प. सदस्य प्रतापराव पाटील, सचिन पवार, डॉ.दीपक पाटील, डॉ.निखिल बाविस्कर, उपसरपंच किशोर बोरसे, मुक्ती फाउंडेशनचे अध्यक्ष मुकुंद गोसावी, स्वप्निल पालवे यांच्यासह जांभोरे गावातील प्रतिष्ठित ग्रामस्थ उपस्थित होते.





शिबिरात नागरिकांना प्रधानमंत्री आयुष्यमान भारत, महात्मा फुले जन आरोग्य विमा योजना आदी योजनांची माहिती देण्यात आली. तसेच आपले आरोग्य व त्यावर उपचाराबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. शिबिरात १५७ रुग्णांची तपासणी करण्यात आली. यात हृदयरोग, रक्तदाब, मधुमेह, ऑक्सिजन मात्रा आणि जनरल तपासणीचा समावेश होता.

**मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार**

आरोग्य शिबिराचे समन्वयक मुकुंद गोसावी यांनी, आलेल्या रुग्णांची ज्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे, अशा निवडक रुग्णांची नाव नोंदणी करून त्यांच्याकरता पुढील सेवा कार्य जीपीएस व मुक्ती फाउंडेशनतर्फे करण्यात येईल, असे सांगितले. दरम्यान, ग्रामीण भागातील नागरिकांसाठी विशेष आरोग्य शिबिर घेतल्याबद्दल नागरिकांनी आयोजकांचे कौतुक केले.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी शुभम चौहान, राजेंद्र बिसेन, करण परदेशी, अक्षय बिसेन, अमोल सोनवणे, प्रवीण पाटील, नाना मेंबर, कैलास महाराज यांच्यासह पदाधिकारी, ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

## रामराज्य संघातर्फे पत्रकारांचा सन्मान

प्रतिनिधी । फैजपूर

स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ जयंतीचे औचित्य साधून व पत्रकार दिनानिमित्त रामराज्य सेवाभावी संघाच्यावतीने शहरातील पत्रकार बांधवांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वार्ता पत्रकार फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा.डॉ. राजेंद्र तायडे हे होते. सुरुवातीला स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांचे तैलचित्राला जेष्ठ पत्रकार अरुण होले व संघटनेच्या कोषाध्यक्षा मृणालिनी राणे यांच्याहस्ते माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर जेष्ठ पत्रकार अरूण होले, डॉ. राजेंद्र तायडे, शाकिर मलक, योगेश सोनवणे, राजू तडवी, सलीम पिंजारी, इंदू पिंजारी आदी पत्रकार बांधवांचा शाल, गुलाब पुष्प देवून सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक करतांना संस्थाध्यक्ष संजय सराफ यांनी, स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ यांचे राष्ट्रधर्म नीती लेखणीत उतरवावी, असे आवाहन केले.

## थोडक्यात

### भुसावळात पार पडली स्वदेशी संकल्प मॅरेथॉन

**भुसावळ ।** येथील द वर्ल्ड स्कूल येथे स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त इयत्ता ५ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी २ किलोमीटर स्वदेशी संकल्प मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीला विद्यार्थ्यांना एकत्रित करून स्वदेशी व विकसित भारत, आत्मनिर्भर भारत संबंधित प्रतिज्ञा घेण्यात आली. युवकांमधील शारीरिक सुदृढता व राष्ट्रीय समृद्धता या संकल्पनेनुसार या मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते.

### भारत विद्यालयात सायबर क्राईमवर मार्गदर्शन

**यावल ।** तालुक्यातील न्हावी येथील भारत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात नुकतेच व्ही.बी. वारके यांच्या अध्यक्षतेखाली सायबर क्राईम या विषयावर मार्गदर्शन तसेच चर्चासत्र संपन्न झाले. यावेळी ऑनलाईन फसवणूक कशी होती यावर मार्गदर्शन करण्यात आले आहे. कार्यक्रमास उपमुख्याध्यापिका संगीता फिरके, पर्यवेक्षक ए. एस. ठोसर यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार एस.एम. दुसाने यांनी केले.

## २० शेतकऱ्याच्या शेतातून लांबवल्या इलेक्ट्रीक वायरी

प्रतिनिधी । जामनेर

**फत्तेपूरसह परिसरात चोरट्यांनी धुमाकुळ घातला आहे. आधीच २३ शेतकऱ्यांच्या वीज पंपाच्या इलेक्ट्रीक वायरी चोरी झाल्याच्या घटनेचा उलगडा होत नाही, तोच लोणी परिसरात पून्हा एकदा विद्युत पंपाच्या इलेक्ट्रीक वायरी चोरुन नेल्याची घटना घडली आहे. या घटनेत तब्बल २० इलेक्ट्रीक वायरी चोरुन नेण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.**

बुधवार, दि.१४ रोजी रात्री ही घटना घडली असून या घटनेत बाबूराव पाटील, दिलीप बोरसे, बालू ठुबे, काशिनाथ सटाले, शंकर सटाले, रघुनाथ कालभिले, प्रमोद दांडगे, प्रल्हाद कोल्हे, अनंत वाणी, संतोष पाटील, शोभाबाई बोरसे, भावलाल चिकटे, अनिल बलांडे, रामेश्वर चिकटे, अशोक बोरसे, अरुण चिकटे, मनिष डाकोडे, गोपाल कोल्हे, गयाबाई कालभिले, भरत चिकटे या २० शेतकऱ्यांच्या शेतातून वीजपंप व सोलर पंपाच्या इलेक्ट्रीक वायरी लंपास करण्यात आल्या आहेत.

आतापर्यंत एकूण ४३ शेतकऱ्यांच्या शेतातून इलेक्ट्रीक वायर लांबवण्यात आल्या असून यामुळे काही शेतकरी आंदोलनाच्या तयारीत आहेत.

## चाळीसगाव येथे उद्या लोकशाही दिन

प्रतिनिधी । चाळीसगाव

सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी, अडचणी यांची न्याय्य व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणुक करण्यासाठी तालुकास्तरावर लोकशाही दिन राबविण्यात येतो. चाळीसगाव तालुकास्तरावर सोमवार, दि.१९ रोजी लोकशाही दिन राबविण्यात येणार आहे. नागरीकांनी आपला अर्ज दोन प्रतीसह शासन निर्णय परिपत्रक प्रपत्र-१ (अ) लोकशाही दिनाच्या नमुन्यात सादर करावा, असे आवाहन तहसिलदार प्रशांत पाटील यांनी केले आहे.

# भुसावळ–मुंबई पॅसेंजर पूर्ववत सुरू करा!

## • पाचोरा रेल्वे प्रवासी कृती समितीची निवेदनाद्वारे मागणी

प्रतिनिधी । पाचोरा

**पाचोरा रेल्वे स्टेशनवर पंजाब मेल व विदर्भ एक्सप्रेस या गाड्यांना थांबा द्यावा तसेच गोरगरिबांची व चाकरमान्यांसाठी गरजेची असलेली, परंतु सध्या बंद असलेली भुसावळ–मुंबई पॅसेंजर पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी पाचोरा रेल्वे प्रवासी कृती समितीतर्फे निवेदनाद्वारे करण्यात आली.**



भुसावळ रेल्वे विभागाचे डीआरएम पुनीत अग्रवाल यांनी नुकतीच पाचोरा रेल्वे स्टेशनला भेट देवून पाहणी केली. यावेळी पाचोरा रेल्वे प्रवासी कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी डीआरएम अग्रवाल यांची भेट घेवून त्यांना या मागण्यांचे निवेदन दिले.

निवेदनात, पाचोरा रेल्वे स्टेशनवर पंजाब मेल व विदर्भ एक्सप्रेस या गाड्यांना थांबा देण्यात यावा तसेच गोरगरिबांची व चाकरमान्यांची गरजेची असलेली, परंतु सध्या बंद असलेली भुसावळ–मुंबई पॅसेंजर पूर्ववत सुरू करावी आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. विविध गाड्यांचे स्टॉप व स्टेशनवरील सोयी सुविधा या संदर्भात देखील यावेळी चर्चा करण्यात आली. यावेळी प्रवासी कृती समितीचे सुनील शिंदे, भरत खंडेलवाल, प्रा. मनोज बाविस्कर, ॲड.अविनाश भालेराव, संजय जडे, अनिल येवले, शहबाज बागवान, शशिकांत मोरे, खंडू सोनवणे, दीपक दांडगे, दीपक वरुडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## कलाशिक्षक राहुल सोनवणे यांचे चित्रकला यश

### • शिंदखेडा तालुका सरपंच संघटनेने केले होते आयोजन

प्रतिनिधी । भडगाव

**शिंदखेडा तालुका सरपंच संघटनेतर्फे जयकुमार रावल यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत भातखंडे येथील कर्मवीर तात्यासाहेब हरी रावजी पाटील किसान शिक्षण संस्था संचलित माध्यमिक विद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा उत्राण येथील एस.बी संघवी इंटरनॅशनल स्कूलचे कलाशिक्षक राहुल चंद्रकांत सोनवणे यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत त्यांनी तृतीय क्रमांक पटकावला.**

त्याबद्दल त्यांना मान्यवरांच्याहस्ते



स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र आणि ११ हजार रुपये रोख देवून गौरविण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

## ऑलिम्पियाड स्पर्धेत वेदांतिका शुक्लला सुवर्णपदक

प्रतिनिधी । भुसावळ

आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. यात फस्ट लेव्हलमध्ये वेदांतिका अनुप शुक्ल हीने सुवर्णपदक प्राप्त करुन लेव्हल २ साठी पात्र ठरल्याचे आयोजकांतर्फे जाहीर करण्यात आले आहे. वेदांतिका सध्या नवी मुंबई येथील एका आंतरराष्ट्रीय स्कूलमध्ये शिकत आहे. ती भुसावळ येथील प्र. ह. दलाल यांची नात आणि अमृता व अनुप शुक्ला यांची सुकन्या आहे. तिच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. तिला गणिताची विशेष आवड असून पुढे याच विषयात उच्च पदवी मिळवण्याचे ध्येय असल्याचे वेदांतिकाने परीक्षेच्या निकालानंतर सांगितले.

## भडगाव येथे ट्रॅक्टरसह वाळू जप्त; महसूल विभागाची धडक कारवाई



प्रतिनिधी । भडगाव

भडगाव तालुका व शहर परिसरात सुरू असलेल्या अवैध वाळू वाहतुकीविरोधात महसूल विभागाने कडक पावले उचलली असून, एका कारवाईत ट्रॅक्टरसह वाळू जप्त करण्यात आली आहे.

तहसीलदार शितल सोलाट यांच्या मार्गदर्शनाखाली भडगाव पेठ परिसरात महसूल विभागाच्या पथकाने ही कारवाई केली. विना नंबर ट्रॅक्टर व ट्रॉलीद्वारे सुमारे १ ब्रास वाळूची बेकायदेशीर वाहतूक सुरू असल्याचे निदर्शनास आले. कारवाईदरम्यान ट्रॅक्टर, ट्रॉली व वाळू असा संपूर्ण मुद्देमाल ताब्यात घेऊन कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई ग्राम महसूल अधिकारी अविनाश जंजाळे, प्रशांत कुंभारे, योगेश पाटील, समाधान हूल्लूळे, निखिल बावस्कर व प्रसाद दूदूस्कर यांच्या पथकाने केली. अवैध वाळू उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी पुढील काळातही अशा धडक कारवाया सातत्याने सुरू राहणार असल्याचा इशारा महसूल विभागाने दिला आहे.

### ➤ आरोपीवर गुन्हा दाखल...

**महसूल विभागाने केलेल्या या कारवाईत विना नंबर ट्रॅक्टर व ट्रॉली तसेच १ ब्रास वाळू जप्त करण्यात आली आहे. तहसीलदार शितल सोलाट यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली असून यापुढेही अवैध वाळू वाहतुकीविरोधात कडक कारवाई करण्यात येईल असा इशारा, महसुल विभागाकडून देण्यात आला आहे.**

## यावल आगारात इंधन बचतीवर मार्गदर्शन

प्रतिनिधी । यावल

**यावल आगारात शुक्रवार, दि.१६ रोजी इंधन बचत मासिक कार्यक्रम पार पडला. आगार व्यवस्थापक दिलीप महाजन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात इंधन बचतीवर मार्गदर्शन करण्यात आले.**

कार्यक्रमाचे उद्घाटन शासकीय औद्योगिक संस्थेचे निदेशक विजय कुसेकर यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी निदेशक तन्मय चौधरी, जे.टी. महाजन तंत्रनिकेतनचे प्रा.अजय कोळी, मनोज फेगडे, जयंत बेंडाळे, वेदिका वारके, यावल आगारातील तेजस शुक्ल, जतिन बारसे, प्रकाश रावते, संदीप पाटील, अतुल चौधरी, महेंद्र पाटील, किशोर बारी, सी.आर. पाटील, एस.आर. सावकारे, विकास करांडे, सलीम तडवी, सुनील देशमुख, मनोज फळ, इब्राहिम तडवी, श्री चिमणकर यांच्यासह चालक, वाहक, यांत्रिक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

## रोटरी क्लब ऑफ अमळनेरतर्फे गरजूंना कपडे वाटप

प्रतिनिधी । अमळनेर

**गांधली येथील समाजकार्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर घेण्यात येत आहे. शिबिरात रोटरी क्लब ऑफ अमळनेरतर्फे गरजू व्यक्तींना कपडे वाटप करण्यात आले.**




रोटरी क्लबचे अध्यक्ष देवेंद्र कोठारी, सचिव आशिष चौधरी, सदस्य चेलाराम सैनानी, अभिजीत भांडारकर यांच्याहस्ते या कपड्यांचे वितरण करण्यात आले.

यावेळी प्रा.डॉ. सागरराज चव्हाण, स्वयंसेवक सागर कोळी, संध्या पाटील, कोमल भामरे, शितल सोनवणे, प्रा.डॉ. अनिता खेडकर, प्रा.धनराज ढगे, प्रा.विजयकुमार वाघमारे उपस्थित होते.

# प्रदूषणमुक्त जगायचं असेल तर वृक्ष लागवड केली पाहिजे!

## विद्यापीठचे माजी संचालक डॉ.सचिन नांद्रे यांचे प्रतिपादन; राणी लक्ष्मीबाई महाविद्यालयात रासेयो शिबीर उत्साहात

प्रतिनिधी । पारोळा

**मानवाला प्रदूषणमुक्त जगायचं असेल तर आपण वृक्ष लागवड केली पाहिजे. हे येणाऱ्या पिढीसाठी उपयुक्त असेल. टेहू येथील मीयावाकी प्रकल्प पाहून हाच खरा शाश्वत विकास आहे, हे उद्गार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठचे माजी संचालक डॉ.सचिन नांद्रे यांनी काढले.**



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि.७ ते १३ जानेवारीदरम्यान, विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन दत्तक गाव टेहू येथे करण्यात आले होते. या शिबिराच्या समारोपाप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ.व्ही.आर. पाटील, संस्थेचे संचालक ॲड.रोहन मोरे, टेहू येथील सरपंच लीना मनोज मोरे, संभाजी महाले, उपसरपंच प्रतिभा पाटील, कमलाबाई भिल, भगवान भिल, ग्रामविकास अधिकारी चेतनकुमार पाटील, प्रा.डॉ. एस.एम. पाटील, डॉ. एस.एन. साळुंखे, डॉ.एन.जे. बागुल आदी उपस्थित होते. शिबिरामध्ये ग्राम स्वच्छता, प्लास्टिक मुक्त अभियान, एचआयव्ही एड्स, टीबी मुक्त भारत आदींवर जनजागृती तर रक्तगट तपासणी, ग्रामीण विकास, पाणलोट व्यवस्थापन, जल जनजागृती, रस्ता सुरक्षा मतदान जनजागृती, अंधश्रद्धा निर्मूलन, आरोग्य तपासणी आदी उपक्रम राबवण्यात आले.

### ➤ ११५ स्वयंसेवकांनी घेतला सहभाग...

या सात दिवसाच्या शिबिरामध्ये एकूण ११५ स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेऊन सातही दिवस श्रमदान, विविध विषयांवर मार्गदर्शनपर व्याख्यान, सांस्कृतिक व व्यक्तिमत्त्व विकासावर आधारीत उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला. स्वयंसेवकांचे सात गट पाडण्यात आले होते. प्रत्येक गटाने रोजची संपूर्ण जबाबदारी पार पडली तसेच मेक इन इंडिया या धर्तीवर आधारित टेहू आयटीआय येथील महाविद्यालयाला भेट देऊन विविध पद्धतीचे ट्रेड कसे चालतात नव नवीन संशोधन युवक कशा प्रकारे करतात, याचीही पाहणी केली. शिबीर यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. मनीष करंजे, डॉ.जितेंद्र सोनवणे, प्रा.जितूबाई जोगी, जयराम पाटील, अमोल पाटील, सचिन मोरे यांच्यासह टेहू ग्रामस्थ, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.